Hackathon 2.0: तरुणाईच्या टॅलेंटला प्लॅटफॉर्म! हॅकथॉनमध्ये दाखवली कमाल, आदिवासी कार्य मंत्रालयाला सलाम

Hackathon 2.0: तरुणाईच्या बुद्धिमत्तेला वाव मिळावा यासाठी दिल्लीत हॅकथॉन २.० ही मोठी स्पर्धा पार पडली. राष्ट्रीय FRA डिजिटल प्लॅटफॉर्मच्या विकासासाठी आदिवासी कार्य मंत्रालयाची सर्व SIH अंतिम संघांसोबत पुढाकारात्मक वाटचाल केली.

तरुणाईच्या टॅलेंटला प्लॅटफॉर्म

KALYAN DESHMUKH | Updated on: Jan 07, 2026 | 8:47 AM

SHARE

Hackathon 2.0 : नवी दिल्लीतील तरुणाईच्या बुद्धिमत्तेला मोठा वाव मिळाला. दिल्लीत ५–६ जानेवारी २०२६ दरम्यान "हॅकाथॉन २.० – FRA डिजिटल प्लॅटफॉर्म विकासासाठी द्विदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा" आयोजित करण्यात आली होती. आदिवासी कार्य मंत्रालय (MoTA) यांनी ही कार्यशाळा आयोजित केली होती. नवी दिल्ली येथील नॅशनल ट्रायबल रिसर्च इन्स्टिट्यूट (NTRI) येथे हा टॅलेंट सोहळा रंगला. वनहक्क कायदा (FRA), २००६ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी एकात्मिक राष्ट्रीय डिजिटल प्लॅटफॉर्म विकसित करण्यासाठी हा महत्त्वाचा उपक्रम ठरला.

जाहिरात

स्मार्ट इंडिया हॅकाथॉन (SIH) २०२५ मधील सर्व पाच अंतिम संघ या कार्यशाळेचे आकर्षण ठरले. तसेच आदिवासी कार्य मंत्रालयाचे अधिकारी, IIT दिल्ली आणि NIC येथील तांत्रिक तज्ज्ञ हे पण सहभागी झाले. राष्ट्रीय FRA डिजिटल प्लॅटफॉर्मची कार्यात्मक रचना व प्रणाली आर्किटेक्चर अधिक परिष्कृत, एकात्मिक आणि अंतिम स्वरूप देण्यासाठी या कार्यशाळेत सखोल चर्चा झाली. विविध नाविन्यपूर्ण उपाययोजना एकत्र करून एक स्केलेबल, दावा-धारक-केंद्रित (claimant-centric) डिजिटल परिसंस्था निर्माण करण्यासाठी सर्व झटले.